महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००

Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

@mpsc_office @official_mpsc


क्रमांक :१४४२(२)(३)/२०२१/तेवीस दिनांक : २० मार्च, २०२४.

**-:प्रसिद्धीपत्रक :-**

विषय :- महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब मुख्य परीक्षा-२०२१
पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या अंतिम निकालाबाबत.

संदर्भ :- जाहिरात क्रमांक ४९/२०२२.

महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब मुख्य परीक्षा - २०२१ मधील पोलीस उपनिरीक्षक संवर्गाच्या शारीरिक चाचणीमधून मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या मुलाखती दिनांक १२ ते २० मार्च,२०२४ या कालावधीत घेण्यात आल्या आहेत. परंतु प्रस्तुत भरती प्रक्रियेतील अनाथ आरक्षणाच्या मुद्यासंदर्भात मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे O.A. No. ३९६/२०२४ न्यायिक प्रकरण दाखल करण्यात आले आहे. सदर प्रकरणी १८ मार्च,२०२४ रोजी सुनावणी झाली आहे. पुढील सुनावणी दिनांक २१ मार्च, २०२४ रोजी घेण्यात येणार असून दिनांक २१ मार्च,२०२४ पर्यंत विचाराधीन पदाचा निकाल लावू नये असे मा. न्यायाधिकरणाचे आदेश आहेत. यास्तव प्रस्तुत न्यायिक प्रकरणी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांचे संभाव्य आदेश विचारात घेऊन त्याअनुषंगाने प्रस्तुत परीक्षेचा निकाल जाहीर करण्याची कार्यवाही करण्यात येईल. याची संबंधित उमेदवारांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : नवी मुंबई.

उपसचिव (परीक्षोत्तर) (अराजपत्रित)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.